महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २६ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १२० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# राज्यातील २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणणार

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "हवामान बदलाचा शेतीवर होत असलेला गंभीर परिणाम लक्षात घेता, नैसर्गिक शेती ही त्यावरचा सर्वाधिक परिणामकारक उपाय आहे." त्यांनी स्पष्ट केले की, नैसर्गिक शेती ही केवळ सेंद्रिय शेतीसारखी नाही, तर ती अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक आहे. २०१४ मध्ये झालेल्या नैसर्गिक शेती मिशनचा हा उपक्रम राज्य शासनाने सुरू केला मात्र त्यावेळी नैसर्गिक व सेंद्रीय शेती हे दोन्ही एकत्रच राबविण्यात आले. नैसर्गिक आणि सेंद्रीय शेती पद्धतीत भेद ठेवला नव्हता. मात्र २०२३ मध्ये राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या मार्गदर्शनानंतर




नैसर्गिक शेतीतून शाश्वत कृषी क्रांती होईल

महाराष्ट्रात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा राज्य शासनाचा संकल्प आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "शेतकऱ्यांच्या अडचणींचं मूळ हे वाढत्या उत्पादन खर्चात आहे. उत्पादन खर्च कमी करून आणि उत्पादकता वाढवूनच शेती लाभदायक होऊ शकते. नैसर्गिक शेती ही त्याचा सर्वोत्तम उपाय आहे, कारण निसर्गाने दिलेल्या गोष्टींचा उपयोग आपण खते, कीटकनाशके आणि पोषक द्रव्यांकरिता करू शकतो."शेतीच्या सेंद्रिय चक्रात गोधनाचं महत्त्व अधोरेखित करत त्यांनी सांगितले की, "आपल्या संस्कृतीत गोमातेला उच्च स्थान आहे, कारण ती शेतीला जगवते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही संविधानात गोसंवर्धनाचं तत्त्व अधोरेखित केलं, कारण गोधन हे नैसर्गिक शेतीचं मुख्य आधारस्थान आहे." गोमूत्र, शेण, जीवामृत यांमधून मिळणाऱ्या पोषक घटकांमुळे शेतीत जैविक संतुलन राखलं जातं.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सध्याच्या रासायनिक शेतीमुळे अन्नातील विषारी घटक वाढल्याचा उल्लेख करत सांगितले की, "आज कॅन्सरसारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढत आहे. नैसर्गिक शेतीतून तयार झालेले अन्न हे आरोग्यदायी आणि स्वादिष्ट असते. राज्यपाल देवव्रत यांच्या प्रेरणेने जसे गुजरात राज्य नैसर्गिक शेतीचे हब बनले, तसेच महाराष्ट्रालाही आपण नैसर्गिक शेतीचं केंद्र बनवू. या चळवळीतून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणू."

# 'दक्षता जनजागृती सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रम

**'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' ही या वर्षीची संकल्पना**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : भ्रष्टाचार निर्मुलनासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतुने दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर या जन्मदिनापासून 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा केला जातो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षीच्या सप्ताहाची संकल्पना 'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' अशी ठेवण्यात आली असून राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सप्ताहाची सुरुवात २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने होणार असून सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ही प्रतिज्ञा घेण्यात येईल. त्यानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दिलेले संदेश वाचून दाखवले जातील. तसेच हे संदेश राज्यातील जनतेपर्यंत विविध माध्यमांद्वारे पोहोचविण्यात येतील.

सप्ताहादरम्यान कार्यालयांच्या दर्शनी भागात तसेच सार्वजनिक ठिकाणी भ्रष्टाचाराविरोधी जनजागृतीचे बॅनर, पोस्टर आणि संदेश प्रदर्शित करण्यात येतील. मोठ्या शहरांमधील मोक्याच्या ठिकाणी जनजागृती संदेश प्रदर्शित करण्याबरोबरच निबंध, वक्तृत्व, चित्रकला यासारख्या स्पर्धांचे आयोजन केले जाईल.

या बरोबरच भ्रष्टाचार निर्मूलनावर आधारित जनजागृती साहित्य व पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येईल. राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये चर्चासत्रे, कार्यशाळा व विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

## लक्षवेधी

# आता बांगलादेशी घुसखोरांना आळा बसणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** बांगलादेशी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या विषयावर अंतर्गत विचारमंथन सत्रांचे आयोजन करून उपाययोजनाचा अहवाल ATS कडे पाठवण्याचे निर्देश:बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची एक काळी यादी (Black List) तयार करावी, जेणेकरून त्यांना शासकीय कल्याण योजनांचा लाभमिळणार नाही याची खात्री करता येईल

दहशतवाद विरोधी पथक (ATS) कडून प्राप्त गुन्हा दाखल झालेल्या १,२७४ बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांच्या यादीतील व्यक्तींच्या नावावर कोणतेही अधिकृत दस्तऐवज जारी झाले आहेत का, याची खातरजमा करावी. जर असे दस्तऐवज आढळले, तर त्यांचे रद्दीकरण, निलंबन किंवा निष्क्रियता करण्याची आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी व सदर आदेशाची प्रत दहशतवाद विरोधी पथकाकडे माहितीस्तव पाठवावी.या व्यतिरिक्त उघडकीस येणाऱ्या बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांची यादी तयार करून ती विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी या विभागाच्या संगणक कक्षाकडे पाठवावी. ज्यायोगे क्षेत्रिय कार्यालये आणि विभागीय कार्यालये यांना दक्षता घेता येईल.

# दिवाळीत आगीच्या सात घटनांची नोंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे** : दिवाळीमध्ये आगीच्या घटनांची मालिकाच ठाण्यात पाहायला मिळाली आहे. आतापर्यंत सात घटनांची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षात झाली आहे. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी वित्तहानी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

पहिली घटना ठाण्यातील गोकुळनगर येथील वर्धमान इंडस्ट्रीजच्या छतावरील प्लॅस्टिक ताडपत्रीला गुरुवारी (ता. २३) रात्री सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी अवघ्या १० ते १५ मिनिटांत नियंत्रण मिळवले. तर दुसरी घटना बाळकूम, दादलानी पार्क येथील मोकळ्या जागेत असलेल्या भंगाराला रात्री १० वाजण्याच्या सुमारास आग लागली होती. तर तिसरी घटना बाळकूम येथे गुरुवारी (ता. २५) मध्यरात्रीच्या सुमारास महावितरण ऑफिसजवळील नाल्यामधील कचऱ्याला किरकोळ आग लागली. चौथी घटना वागळे इस्टेट परिसरातील अंबिकानगर येथे मध्यरात्री दोनच्या सुमारास समोर आली. पार्किंगमधील मोबाईल जनरेटर व्हॅनला आग लागली होती. पाचवी घटना गुरुवारी मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास दिवा येथे समोर आली. दिवा- शिळ रोडवरील तीन गाळ्यांना आग लागल्याची घटना समोर आली. सहावी घटना ही कोपरी पूर्व, सिद्धार्थनगर येथे बांधकाम सुरू असलेल्या वीणा पॅराडाइजच्या ११व्या व १४व्या मजल्यावर सेफ्टी नेटला आग लागली. सातवी घटना खारटन रोडवरील कचऱ्याला सकाळी सव्वासातच्या सुमारास आग लागल्याचे समोर आले. या घटनांची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी वेळीच धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले.

# जाहिरातविश्वातील ॲडगुरू पीयूष पांडे अनंतात विलीन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : भारतीय जाहिरातविश्वातील ॲडगुरू पीयूष पांडे यांच्या पार्थिवावर मुंबईतील शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. जाहिरात, चित्रपटसृष्टी तसेच कला क्षेत्रातील विविध मान्यवरांनी पांडे यांना अखेरचा निरोप दिला. या वेळी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, मनोज पाहवा, इला अरुण, दिग्दर्शक अशोक पंडित आदी अंत्यसंस्कारावेळी उपस्थित होते.**



**जाहिरातींचा बादशाह म्हणून ओळख असलेल्या पांडे यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी नीता पांडे आहेत. पांडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच जाहिरातविश्वात शोककळा पसरली. पांडे यांनी भारतीय जाहिरात क्षेत्राला नवी दिशा दिली. संवादशैली आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून त्यांनी लोकांच्या भावनांना जोडण्याचे काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय जाहिरातींना स्थानिक भाषेचा आवाज आणि लोकसंग्रहाची ओळख मिळाली.**

**पांडे यांनी साध्यासोप्या शब्दांत अधिकाधिक भावना व्यक्त करण्याची कला शिकवली. त्यांच्या कल्पनांमुळे जाहिरात केवळ व्यावसायिक साधन न राहता संवाद आणि संवेदनांचे माध्यम ठरले. जाहिरातविश्वातील योगदानाबद्दल त्यांना २०१६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पांडे यांच्या जाण्याने जाहिरातजगताचे एक सुवर्णयुग संपले आहे; पण त्यांची विचारशैली, विनोदबुद्धी आणि संवादाची जादू ही येणाऱ्या प्रत्येक सर्जनशील मनासाठी प्रेरणादायी ठेवा ठरेल, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. सहकर्मी, विद्यार्थी आणि मित्रांनी समाजमाध्यमावर पांडे यांना श्रद्धांजली वाहिली.**

# फटाक्यांमुळे ठाण्याच्या प्रदूषणात वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : प्रदूषणकारी फटाके टाळा असे आवाहन करूनही यावर्षी ठाण्यात मोठ्या प्रमाणात प्रदूषण करणारे फटाके वाजवण्यात आले असून यामुळे ठाण्याच्या प्रदूषणात गतवर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे. यावर्षी फटाके वाजवणाऱ्यांची संख्या देखील वाढली असून यामुळे यावर्षी प्रदूषण 7 टक्क्यांनी वाढले आहे. तर ध्वनी प्रदूषणात देखील वाढ झाली असल्याची माहिती पालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने दिली आहे.

दिवाळीच्या सणानिमित्ताने आणि विशेष करून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाकडून दिवाळीपूर्वी आणि दिवाळीमधील हवेची गुणवत्ता तपासली जाते. यावर्षी देखील हवेची गुणवत्ता तपासण्यात आली असून यावर्षी ठाण्याची हवा आणखी प्रदूषित झाली आहे. नागरिकांनी याही वर्षी दिवाळी सण उत्साहाने साजरा केला असून या काळात फटाके वाजण्याच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. मात्र, संध्याकाळी झालेल्या पावसामुळे तेवढ्या काळात प्रदूषणापासून काहीसा दिलासा मिळाला.

अर्थात, यंदा दिवाळीपूर्वीची हवेची गुणवत्ता व दिवाळीच्या काळातील हवेच्या गुणवत्तेचा विचार करता लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रदूषणाच्या पातळीत सरासरी 11.1 टक्के वाढ नोंदवली. तर,



दिवाळीच्या कालावधीत ध्वनीच्या पातळीत 3.2 टक्के वाढ नोंदली गेली आहे. 2024 च्या दिवाळी कालावधीतील हवेच्या गुणवत्तेशी तुलना केली असता यंदा हवेतील प्रदूषण पातळीत 7.2 टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या 3 वर्षांच्या दिवाळीच्या कालावधीतील वायू प्रदूषणाचे मूल्यमापन केले असता असे निदर्शनास येते की, 2023 मध्ये दिवाळी कालावधीत हवा गुणवत्ता निर्देशांकामध्ये 62.6 टक्के इतकी वाढ झाली. 2024 मध्ये दिवाळी कालावधीत निर्देशांकात 33.9 टक्के वाढ झाली होती.

यंदा पावसामुळे प्रदूषणात काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र दिसत असले तरी पाऊस थांबल्यानंतर धुलिकणात अचानक मोठी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही धोकादायक स्थिती आहे. त्यावर मात करण्यासाठी केवळ हरित फटाक्यांकडे आपला कल नेणे ही काळाची गरज आहे. पावसामुळे ठाण्यातील सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक मध्यम पातळीवरच राहिला. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रदूषणामध्ये सरासरी 11.1 टक्के वाढ नोंदली गेली, असे ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी सांगितले.

### हवा गुणवत्तेचा तुलनात्मक अभ्यास...

महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने ठाणे शहरात दिवाळी 2025 कालावधीतील हवेच्या गुणवत्तेचा अभ्यास केला. मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आणि ज्युनिअर केमिस्ट ओमसत्याशिव परळकर यांनी हा अभ्यास केला. या अभ्यासात, दीपावली पूर्व व दीपावली कालावधीत (लक्ष्मीपूजन) ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता तपासण्यात आली. त्यानुसार 11 ऑक्टोबर रोजी दीपावली पूर्व कालावधीत हवेतील गुणवत्ता निर्देशांक 141 इतका होता. तर, 21 ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हवा गुणवत्ता निर्देशांक 157 इतका होता. दिवाळीच्या कालावधीत ध्वनीच्या पातळीत 3.2 टक्के वाढ नोंदली गेली आहे. गतवर्षी हे प्रमाण 86 एलमॅक्स एवढे होते. तर, यंदा 89.2 एलमॅक्स एवढे प्रमाण नोंदले गेले आहे.







# राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष(अजित पवार गटाचे) ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळे यांचा राजीनामा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुक्यातील वरप ग्रामपंचायतीचे माझी सरपंच, कल्याण पंचायत समितीचे उपसभापती, आणि आता कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक असलेले राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अजित पवार गटाचे ठाणे जिल्हाग्रामीण चे अध्यक्ष भरत(भाऊ) गोंधळे यांनी ऐन जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर राजीनामा दिल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून हा अजित पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे. ठाणे जिल्हा परिषदेच्या गट आणि गणांचे नुकतेच



आरक्षण नुकतेच जाहीर झाले होते, यामध्ये कांबा जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण असा पडला असल्याने येथे इतर पक्षाप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे(अजित पवार)गटाचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळे हे इच्छुक होते, ते जिल्हा अध्यक्ष झाल्यापासून पक्षाची ताकत वाढली होती, शिवाय गावचे सरपंच ते पंचायत समितीचे उपसभापती, बाजार समितीचे सभापती अशी विविध महत्त्वाची पदे भूषविली होती, त्यांचे राजकीय क्षेत्रातील गुरु, मार्गदर्शक, पक्षाचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांचे चिंरजीव प्रतीक हिंदूराव यांनी अचानक कांबे गटातून निवडणूक लडणार असल्याचे कार्यकर्ते यांना सांगितल्याने सर्वानाच धक्का बसला, कांबा गट हा म्हारळपाडा, आणि,२वार्ड यांच्यावर अवलंबून असल्याने येथे बाहेरील उमेदवार किती टिकाव धरेल हा खरा प्रश्न उपस्थित होत आहे, अशीच परिस्थितीत भरत गोंधळे यांनी तब्बेतेचे कारण पुढे करून जिल्हाध्यक्ष व सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे हा अजित पवार गटाला न परवडणारा मोठा धक्का ठरु शकतो, काही दिवसापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुरबाड ला जात असताना त्यांचे जंगी स्वागत वरप येथे श्री गोंधळे यांनी केले होते. त्यामुळे आता ते कोणत्या पक्षात जातात यावर पुढील राजकीय समीकरण निर्माण होणार आहे.


# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

## चित्र रेखाटत असरानी यांना श्रद्धांजली



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : विनोदाचा बादशहा सिने कलाकार गोवर्धन असरानी यांचे ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यामुळे सिने विश्वात मोठी पोकळे निर्माण झालेली आहे. ज्या कलाकाराने अनेक दशकं प्रेक्षकांना हसविण्याचे काम केले अशा या कलाकारांस कला शिक्षक यश महाजन यांनी जलरंग माध्यमातून पोर्ट्रेट चित्र रेखाटून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. हे चित्र रेखाटायला मला तिन ते चार तास अवधी लागला.

# जिल्हा परिषद स्वबळावर निवडणूक लढविण्याची शिवसेनेची तयारी सुरू



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका संदर्भात वरिष्ठ स्तरावर अद्याप कोणत्याही प्रकारचा निर्णय होत नसल्याने शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेने स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून जिल्हा परिषदेच्या 21 जागांकरिता मुलाखती घेण्याची सुरुवात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली आहे.त्यामुळे
भाजपासह मित्र पक्षात खळबळ उडाली आहे.शिवसेनेने सुरू केलेल्या मुलाखती साठी इच्छुक उमेदवारांनी उस्फूर्तपणे सहभाग घेत निवडणुकीसाठी जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या कडे अर्ज भरून देत जि.प.गटात निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे.

आगामी होणाऱ्या भिवंडी पंचायत समिती व ठाणे जिल्हा परिषदेच्या त्याचबरोबर नगरपरिषद व महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजप शिवसेना व राष्ट्रवादी महायुतीच्यावतीने निवडणुका लढविण्यासाठी चर्चा सुरू झाली आहे.मात्र याबाबत अद्यापही कोणत्याही निर्णय होत नसल्याने भिवंडी पंचायत समिती 42 गण व जिल्हा परिषद 21 गटामध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या उपस्थितीत 21 जिल्हा परिषद गटातील उमेदवारांच्या मुलाखती कशेळी येथील शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख कार्यालयात शुक्रवारी आयोजित करण्यात आल्या होत्या यावेळी शिवसेनेचे उपनेते रुपेश म्हात्रे,अरुण पाटील,निलेश सांबरे,मारूती धिरडे, लोकसभा संपर्कप्रमुख मदन नाईक महिला आघाडीच्या मोनिका पालवे,कशेळी सरपंच वैशालीताई थळे,जि.प.सदस्य गोकुळ नाईक, शहरप्रमुख शाम पाटील, तालुकाप्रमुख इंद्रपाल तरे,गुरूनाथ म्हात्रे,ज्ञानेश्वर मुकादम,युवासेनेचे लवेश नाईक अदि मान्यवर मुलाखती घेण्यासाठी उपस्थितीत होते. तत्पूर्वी मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी सांगितले की आगामी होणाऱ्या निवडणुका लढविण्यासाठी शिवसेना सज्ज झाली असुन कार्यकर्तेनी कामाला सुरुवात करावी.पक्ष देईल तो उमेदवार निवडून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावेत, आपले आपसातील मतभेद विसरून एकदिलाने काम करावे आणि ठाणे जिल्हा परिषदेवर शिवसेना महायुतीचा भगवा फडकवा असे आवाहन थळे यांनी उपस्थित पक्ष पदाधिकाऱ्यांना केले.पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षा प्रमुख एकनाथ शिंदे व जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि निवडणूक जिंकण्यासाठी कामाला लागावे पक्ष शिस्तही महत्त्वाची आहे ती टिकली तर आपण विजय होऊन असा विश्वास यावेळी शिवसेना उपनेते निलेश साबरे यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषदेच्या सर्व जागा लढवण्यासाठी शिवसेनेच्यावतीने तयारी सुरू झाली आहे.त्यामुळे इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी कामाला सुरुवात करावी असे आवाहन शिवसेना उपनेते रूपेश म्हात्रे यांनी केले आहे.जिल्हा परिषदेची उमेदवारी मिळावी यासाठी गणेशपुरी,अंबाडी, मोहंडूळ,राहनाळ,काल्हेर,पडघा बोरीवली,कोनगांव, अंजूर दिवे,खारबाव अशा विविध जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील इच्छुक उमेदवार तसेच पक्षाचे पदाधिकारी व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीचे बिगुल वाजण्या आधी मुरबाडमध्ये इच्छूकांची भाऊगर्दी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण जाहिर झाल्या पासून अनेक इच्छुक उमेदवारांचा हिरमोड झाला असला तरी तालुक्यातील नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण महिला या पंचायत समिती गणात व काही जिल्हा परिषद गटात अनेक नवखे उमेदवार निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचे चित्र सध्या तालुक्यात सोशल मिडियावर व दिपावलीच्या शुभेच्छा बनरवरून दिसत आहे.

तालुक्यात पंचायत समितीचे सोळा गण व जिल्हा परिषदेचे आठ गट आहेत. यामध्ये जिल्हा परिषदेचे तीन गट अनुसुचित जमातीसाठी आरक्षित झाले आहेत, तर पंचायत समितीची एक जागा अनुसुचित जातीसाठी राखीव झाली आहे. उर्वरित जागांवर सध्या अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत काहींनी तर तशी वातावरण निर्मिती देखील करण्यास सुरवात केली आहे.

दुसरीकडे मुरबाड मध्ये राजकीय भुकंप होणार असल्याच्या चर्चा गेले अनेक दिवस होत आहेत. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष गोटिराम पवार राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला रामराम करून पुढील राजकीय समिकरणे जुळविण्यासाठी भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा सध्या मुरबाड मध्ये जोरात सुरू आहे. परंतु याबाबत सुभाष पवार यांच्याशी संपर्क केला असता अजून तसा कोणताही निर्णय झाला नसून ही फक्त लोकांमध्ये चर्चा आहे. भाजपच्या कोणत्याही नेत्याशी माझा संपर्क झाला नसल्याचे त्यांनी सांगितले असले तरी असे झाल्यास पक्षश्रेष्ठी समोर जागा वाटपाचा मोठा पेच निर्माण होणार असून नाराजांची डोकेदुखी मात्र वाढणार यात शका नाही.

### सुभाष पवारांच्या इंन्ट्रीमुळे गणिते बदलणार

दरम्यान निवडणुकीचा जाहिरनामा अजून निघाला नसला तरी अनेक मात्तबर पुढारी राजकीय घराणेशाही पुढे चालविण्यासाठी आपल्याच वारसदारांना पुढे करत धडपडत आहेत तर नविन कार्यकर्त्यांना आपणही पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे किमान सदस्य व्हावे यासाठी अनेकजण इच्छुक असून ते सुद्धा नशिब अजमावू पाहत आहेत.

# भागवत भूषण पुरस्कार ह.भ.प. राम महाराज काजळे यांना जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : यंदाचा २०२५ भागवत भूषण पुरस्कार ह.भ.प. राम महाराज काजळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच ह.भ.प. जगताप बाबा आडगावकर यांचा ७५ वा अभिष्टचिंतन सोहळा देखील होणार आहे. या निमित्ताने श्री क्षेत्र चारधाम चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई आयोजित वैकुंठवासी गुरुवर्य दादा महाराज मनमाडकर यांच्या आशीर्वादाने व अध्यक्ष ह.भ.प. जगताप बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली भूवैकुंठ पंढरपूर येथे जगन्नाथ महाराज मठ गोपाळपूर मध्ये सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर ते सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर पर्यंत श्रीमद्भागवत कथा अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होणार आहे.

सप्ताह कालात श्रीमद्भागवत कथा, कथाव्यास ह.भ.प. शितल गवारे यांच्या मुखर्विंदातून सकाळी ९ ते ११ या वेळेत संपन्न होईल. दररोज सायंकाळी ७ ते ९ कीर्तन : ह.भ.प. बाळासाहेब महाराज वाघचौरे, ह.भ.प. विलास महाराज फडतरे, ह.भ.प. गणेश महाराज राठोड, ह.भ.प श्याम महाराज शास्त्री, ह.भ.प. मधुकर महाराज पाटील, ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. नामदेव महाराज आव्हाड आणि काल्याचे किर्तन ह.भ.प. शहाजी महाराज पाटील, कोल्हापूर यांचे होऊन काल्याच्या महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.

## पडघ्यात "दिवाळी पहाट" कार्यक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे दिवाळी सणानिमित्त आयोजित "दिवाळी पहाट" कार्यक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पडघा सांस्कृतिक मंच यांच्या वतीने "दिवाळी पहाट" कार्यक्रमाचे आयोजन रुचीरा हॉटेलच्या बाजुला बाजारपेठ पडघा येथे बुधवारी करण्यात आले होते यावेळी प्रसिद्ध भजन सम्राट ह. भ. प. वैभव मंडलिक व त्यांच्या सहकाऱ्यांनी भक्तीगीत भावगीते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली तर सांस्कृतिक मंचाच्या वतीने आयोजित रांगोळी व किल्ला स्पर्धेच्या प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक व किल्ले स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्वांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तर कार्यक्रमासाठी उपस्थीत विविध मान्यवरांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील उद्योजक पंडीत पाटील, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, सरपंच रविंद्र विशे शिवसेना विधानसभा संघटक मनोहर ठाकरे, कृषी बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील, दिनेश गंधे, अशोक शेरेकर, संजय पटेल, अक्षय भोईर, सचीन बिडवी, आंनद गुप्ता, नितीन चंदे, जयेश जाधव, ग्रामपंचायत सदस्य, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थीत होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# पडघ्यात मातीच्या किल्ले बांधणीचा उत्साह

## ऐतिहासिक किल्ले उभारून जपली परंपरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे दिवाळीत मातीचे किल्ले बांधणीचा उत्साह कायम असुन विवीध ऐतिहासिक किल्ले उभारून मुलांनी तरुणांनी जपली पंरपंरा

दिवाळीच्या सणात पारंपरिक मातीचे किल्ले बांधण्याची परंपरा आजही पडघा व परिसरात उत्साहात दिसून येते. ऐतिहासिक वारसा जपण्याच्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण ठेवण्याच्या उद्देशाने पडघ्यातील तरुणाई आणि बालमंडळींनी यंदाही विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत.



पडघ्यातील ब्राह्मण आळी येथील मिहिर राऊत आणि निल राऊत यांनी 'पन्हाळगड' किल्ल्याची प्रतिकृती तयार केली असून, ध्रुवांग थोरे, दीप कांबळे, अर्पित पाठक, आयुष लोंढे, मित थोरे, जतीन लोंढे आणि संकेत राठोड यांनी 'मुरुड-जंजिरा' किल्ला उभारला आहे. तर सोनार आळी येथील रोहित कांबळे, गायत्री महाजन,चैतन्या महाजन, रोहीत कांबळे,प्रिया कांबळे, तनिष्का जोशी लाभश्री जोशी, सार्थक हाडपे शौर्य हाडपे , प्रियांश्री पातकर यांनी 'मल्हारगड (सोनेरी किल्ला)' साकारला. तर शास्त्रीनगर येथील स्वराज दळवी, यश दळवी यांनी 'सिंधुदुर्ग' किल्ला उभारला, तर रोहिदास नगरातील वेदांत भोईरने 'विजयदुर्ग' किल्ल्याची प्रतिकृती साकारली. याच भागातील श्लोक जाधव, मंथन जाधव राज जाधव, कौस्तुभ जाधव,यज्ञेश जाधव, यश जाधव यांनी 'राजगड' किल्ला उभारला आहे. बालाजी नगर मधील वेणुबाई मित्र मंडळाच्या वतीने अनुष्का दिनकर, गणेश मूडे, सोहम आणि सक्षम कदम, लाभेश कदम, पियुष आणि दिव्या जाधव, वेद पितांबरे, पराग तावडे, निधी दिनकर आणि संग्राम पाटील यांनी 'सिंधुदुर्ग' किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली.मातीने बनवलेले किल्ले रंगरंगोटी करुन छत्रपती शिवाजी महाराज आणि शूर मावळ्यांच्या मूर्तीसह सजवलेल्या किल्ल्यांनी दिवाळीच्या सणात सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जपला आहे.

# ठाण्यात मालवणी जत्रोत्सवाचे थाटात आयोजन

## कोकणातील संस्कृती, परंपरा आणि चवीचा अनोखा संगम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दिवाळीच्या सुट्यांचा सोहळा अधिक रंगतदार करण्यासाठी, ठाणेकर नागरिक आणि कोकणवासीयांना कोकणातील संस्कृती, परंपरा आणि धार्मिकतेचा अनुभव देण्यासाठी कोकण प्रतिष्ठान, एकलव्य उत्कर्ष मंडळ आणि अश्वमेध प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने, कै. जयंत परब यांच्या स्मरणार्थ, समाजसेवक विजय चिंदरकर व माजी नगरसेविका कांचन चिंदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मालवणी जत्रोत्सव २०२५ चे दि. २४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी डवले नगर मैदान, श्री स्वामी समर्थ महाराज मठ, लोकमान्य नगर, ठाणे येथे आयोजन करण्यात आले आहे.



यात्रोत्सवाचा उद्घाटन सोहळा मा. आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी मालवणी नटसम्राट दिगंबर नाईक, हास्यजत्रेचे संगीतकार आमिर हडकर, मा. नगरसेवक दीपक वेतकर, टीना ताई, तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जत्रोत्सवामध्ये धर्मविजय, देवी भवमाया, खरी पतिव्रता, गोमय गणेश, जय जय रवळनाथ, विधी संकेत, कर्मप्रकोप, जंगी डबलबारी अशी कोकणातील पारंपारिक दशावतारी नाटके दररोज रंगणार आहेत. तसेच, कोकणातील अस्सल खाद्यपदार्थ, मसाले आणि चवींचा दररोज सायं. ६.३० ते रात्री १०.०० पर्यंत मनमुराद आस्वाद घेता येईल.

या जत्रेमधून कोकणची गंध, गाणी, गप्पा आणि गावठी ऊब ठाणेकरांना अनुभवता येणार आहे. म्हणूनच सर्व ठाणेकर नागरिकांनी आपल्या परिवारासह या सांस्कृतिक सोहळयात सहभागी होऊन कोकणाच्या मातीचा सुगंध आणि संस्कृतीचा आनंद लुटावा असे समाजसेवक विजय चिंदरकर आणि माजी नगरसेविका कांचन चिंदरकर यांनी आवाहन केले आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत
करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन,
रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क,
जाहिरात, चित्रपट निर्मिती,
डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .



- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




**मेष**
तुमचे काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबाबत तुम्ही उत्साहित असाल.

**वृषभ**
अध्यात्मात थोडा वेळ घालवाल, ज्यामुळे तुमच्या मनाला शांती मिळेल. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल.

**मिथुन**
शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि प्रशंसा केली जाईल.

**कर्क**
एखाद्या व्यापाऱ्याशी करार करू शकता. शांत मनाने आणि गांभीर्याने तुम्ही हाती घेतलेले कोणतेही काम तुम्हाला नक्कीच यश देईल.

**सिंह**
तुम्हाला वडिलांच्या सेवांचा फायदा होईल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्या आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या सोडवण्यास मदत करतील.

**कन्या**
नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल. कायदेशीर बाबी कोणाच्या तरी मदतीने सोडवल्या जातील .

**तूळ**
तुमचे कनिष्ठ विद्यार्थी देखील तुमच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करतील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल.

**वृश्चिक**
तुमचे काम पुढे नेण्यासाठी तुम्ही एक नवीन शाखा उघडू शकता. तुम्ही काळाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न कराल, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**धनु**
व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि मुलेही मनापासून अभ्यास करतील.

**मकर**
तुम्हाला दिलासा मिळेल. एखादा मोठा वैयक्तिक निर्णय घेऊ शकता. मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळेल आणि मुलाखत यशस्वी कराल.

**कुंभ**
अविवाहित लोकांना लग्नाचा प्रस्ताव येऊ शकतो. सरकारी योजनेचा लाभ घेण्यास यशस्वी व्हाल. मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना आखू शकता.

**मीन**
तुमचा व्यवसाय भरभराटीला येईल आणि तुमच्या भौतिक सुखसोयी वाढतील. तुमचे आरोग्य चांगले राहील आणि तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल.

नियमित
वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप
वार्ता

# दिवाळीत पर्यावरणाचं दिवाळं




दिवाळीच्या काळात दिल्लीतील लोकांच्या पोटात गोळा येतो, कारण फटाक्यांमुळे होणारे प्रचंड प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणामुळे शहराची हवा विषारी होते. कोट्यवधी रुपयांचे फटाके फुटतात आणि वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) ४०० च्या वर जातो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ आणि श्वास घेण्यास त्रास होतो. फटाक्यांमधील रसायने हवेत नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि पीएम २.५ व पीएम १० सारखे अतिसूक्ष्म कण सोडतात, जे फुफ्फुसात आणि रक्तप्रवाहात थेट शिरतात. यामुळे लहान मुले, रुग्ण आणि वृद्धांचे आरोग्य धोक्यात येते. दिल्ली हे जगातील एकमेव शहर असावे जिथे प्रदूषणाचे प्रमाण इतके वाढते की शाळांना सुट्ट्या द्याव्या लागतात. दरवर्षी दिवाळीत 'से नो टू क्रॅकर्स' मोहीम राबवली जाते, पण ती निरर्थक ठरते. यंदा थंडी लवकर आल्याने दिवाळीपूर्वीच हवेची गुणवत्ता खालावली आहे. बंदी असूनही दिल्लीत दरवर्षी किमान २० कोटी रुपयांचे फटाके विकले जातात. २०२३ मध्ये दिल्ली सरकारने फटाक्यांवर पूर्ण बंदी घातली होती, तरीही १२ हजार किलो फटाके जप्त करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने हरित फटाक्यांना काही अटींसह परवानगी दिली आहे, पण ते खरोखरच हरित आहेत की नाही हे तपासणे यंत्रणेसाठी अशक्य आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी स्पष्ट केले की, निर्बंधांचे वारंवार उल्लंघन होत असल्याने फटाकेबंदीबाबत संतुलन राखणे आवश्यक होते. हरित फटाक्यांमुळे उत्सर्जन ३०-३५% कमी होऊ शकते, असे म्हटले जाते, पण त्यांची सत्यता पडताळण्यासाठी दिल्लीत कोणतीही प्रयोगशाळा नाही. दिल्लीत हिवाळ्यात हवा विषारी होण्यामागे फटाके, पराली जाळणे, वाहनांचा धूर, औद्योगिक उत्सर्जन, धूळ आणि हवामानाचे घटक कारणीभूत असतात. गेल्या ११ वर्षांपासून दिवाळीनंतर दिल्लीतील हवेची पातळी 'अत्यंत खराब' किंवा 'गंभीर' श्रेणीत राहिली आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे, पण ही वृत्ती लोकांमध्ये दिसत नाही.

दिल्लीत दिवाळी आली की लोकांच्या पोटात गोळा येतो, हे वाक्यच परिस्थितीचे गांभीर्य दर्शवते. दिवाळीचा सण आनंद आणि उत्साहाचा असला तरी, दिल्लीकरांसाठी तो चिंतेचा विषय बनतो. कारण फटाक्यांमुळे होणारे प्रचंड प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणामुळे शहराची हवा इतकी विषारी होते की श्वास घेणेही कठीण होते. कोट्यवधी रुपयांचे फटाके फुटतात आणि वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) ४०० च्या वर जातो, जी अतिधोकादायक पातळी आहे. यामुळे डोळ्यांची जळजळ वाढते आणि श्वसनाचे त्रास सुरू होतात. फटाक्यांमध्ये वापरली जाणारी रसायने, धातूचे क्षार आणि स्फोटक पदार्थांचे मिश्रण जळल्यावर नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि पीएम २.५ व पीएम १० सारखे अतिसूक्ष्म कण हवेत मिसळतात. हे कण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसात आणि रक्तप्रवाहात शिरतात. यामुळे लहान मुले, आजारी व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात येते. दिल्ली हे जगातील एकमेव शहर असावे जिथे प्रदूषणाचे प्रमाण इतके वाढते की शाळांना सुट्ट्या द्याव्या लागतात.
गेल्या काही वर्षांपासून दिल्लीत दिवाळीच्या वेळी फटाक्यांविरुद्ध 'से नो टू क्रॅकर्स' (फटाक्यांना नाही म्हणा) अशी मोहीम सुरू होते. 'मेणबत्ती संप्रदाय' सारखे गट यात पुढाकार घेतात. मात्र, दिवाळीत अशा मोहिमांची निरर्थकता एखाद्या फुसक्या फटाक्यासारखी पुन्हा पुन्हा सिद्ध होते. यंदा तर थंडी लवकर आल्याने दिवाळीपूर्वीच हवेची गुणवत्ता खालावली आहे आणि 'एक्यूआय'ने (AQI) इशारे देण्यास सुरुवात केली आहे. एका अंदाजानुसार, बंदी असतानाही दिल्लीत दर दिवाळीत किमान २० कोटी रुपयांचे फटाके विकले जातात. २०२३ मध्ये दिल्ली सरकारने फटाक्यांची विक्री, साठवणूक आणि वापरावर पुन्हा एकदा पूर्ण बंदी घातली होती. तरीही, त्याच वर्षी फक्त एका महिन्यात १२ हजार किलो फटाके जप्त करण्यात आले होते. यंदाही अशी जप्ती सुरू आहे. पण जप्त केलेले फटाके ठेवलेल्या ठिकाणीच दिवाळीत जो दणदणाट होतो, त्याचे मूळ कसे शोधायचे, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.
दिल्लीकर बंदीला जुमानत नाहीत आणि जुमानणार नाहीत, हा पूर्वानुभव असल्याने सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी हरित फटाक्यांना दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (एनसीआर) काही अटींसह परवानगी दिली. मात्र, फुटणारे फटाके खरोखरच हरित आहेत की नेहमीसारखेच विषारी, हे तपासणे यंत्रणेसाठी केवळ अशक्य आहे. फटाकेबंदी आमच्याच सणाला का, असा ओरडा करणाऱ्यांचा न्यायालयाने जाता जाता हिरमोड केला असणार. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी स्पष्ट केले की, निर्बंधांचे वारंवार उल्लंघन केले जात असल्याने, फटाकेबंदीबाबत संतुलन राखणे आवश्यक होते. या अटी-शर्तींना विरोध करताना फटाक्यांवरील वेळमर्यादा काढून टाकण्याची मागणी केली गेली, जी स्वाभाविकच होती. अशा हरित फटाक्यांमुळे उत्सर्जन ३० ते ३५ टक्क्यांनी कमी होणे शक्य असल्याचे सांगितले जाते, तरीही बाजारातील मागणी आणि पुरवठा यांचे प्रमाण इथेही व्यस्तच असते. हरित फटाक्यांना १०० टक्के निरुपयोगी म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल, कारण तेही प्रदूषण करतातच. असे फटाके धूर, सल्फर डायऑक्साइड आणि नायट्रोजन ऑक्साईड तुलनेत कमी उत्सर्जित करतात. सामान्य फटाक्यांची आवाज पातळी १६० डेसिबलपर्यंत असते, तर हरित फटाक्यांची आवाज पातळी ११० ते १२५ डेसिबल असते, असे युक्तिवाद केले जातात. पण त्यांची सत्यता पडताळण्यासाठी संपूर्ण दिल्लीत कोणतीही प्रयोगशाळा किंवा चाचणी सुविधा नाही.
बाहेर फटाक्यांचा आणि घरात लोकांच्या जल्लोषाचा 'स्फोट', ही परंपरा पाळल्याशिवाय अनेक दिल्लीकरांची दिवाळीची रात्र साजरीच होत नाही! मुळात 'हरित फटाके' नावाचा प्रकार जादूच्या कांडीसारखा वायू प्रदूषण गायब करतो, हा समजच चुकीचा आहे, असे वैज्ञानिकांनी आणि अनेक जाणकारांनी वारंवार स्पष्ट केले आहे. 'हरित फटाके म्हणजे सात्त्विक दारूसारखे' असेही विनोदाने म्हटले जाते. दिल्लीत दर हिवाळ्यात हवा विषारी बनते त्याला इतरही अनेक कारणे आहेत. हिवाळ्यात दिल्लीतील हवा विषारी बनण्यामागे फटाके, पराली जाळणे, वाहनांचा धूर, औद्योगिक उत्सर्जन, धूळ आणि हवामानाचे घटक कारणीभूत असतात. पंजाब आणि इतर राज्यांमध्ये शेतातील काडीकचरा (पराली) जाळायला सुरुवात झाली आहे. गेल्या ११ वर्षांची आकडेवारी पाहता, फटाक्यांना परवानगी असो वा कागदोपत्री बंदी असो, दिवाळी आणि त्यानंतरच्या दिवशी दिल्लीत हवेची पातळी 'अत्यंत खराब' किंवा 'गंभीर' श्रेणीत राहिलेली आहे. दिवाळीनंतर हिमालयाकडून येणारे थंड वारे आणि हवेत अडकून पडणारे प्रदूषणकारी घटक वाढतात व हवा अधिक विषारी बनते.

प्रदूषणाच्या इतर घटकांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, हे सत्य सांगणारी शहाणी माणसे अल्पसंख्यांक आहेत. त्यामुळे फटाक्यांइतकेच प्रदूषण करणारी, भकाभका धूर सोडत रस्त्यांवर धावणारी लाखो वाहने, तसेच दिल्लीतील हिवाळ्यातील हवामानाची परिस्थितीही प्रदूषण वाढवण्यासाठी हातभार लावते. न्यायालयाने या प्रदूषण संकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी वारंवार कठोर आदेश दिले, परंतु 'लक्षात कोण घेतो?' हाच अनुभव येतो. ही परिस्थिती सुधारणार नाही असे नाही, पण त्यासाठी सरकारनेच सर्व काही केले पाहिजे, ही वृत्ती सोडून प्रदूषण कमी करण्याची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून केली पाहिजे. पण आपल्याकडे घोडं नेमकं तिथेच अडतं ना!

## प्रबोधनकार ठाकरे सरोवरात सुरु झालेल्या
# नौकाविहारास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील प्रबोधनकार ठाकरे सरोवरातील (शेनाळे तलाव) नौका विहाराच्या सुविधेस(boating) नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून आता महापालिकेकडून या ठिकाणी फ्लोटिंग ब्रीज, कारंजे, उपहारगृह, लेझर शो, लहान मुलांना खेळण्यासाठी जागा अशा विविध सुविधा पुरविण्यात येणार आहेत, तसेच तलावाभोवती जॉगिंग ट्रॅक व्यायामासाठी विशेष जागा, वरिष्ठ नागरिकांसाठी बैठकीची व्यवस्था करण्यात आली आहे . नागरिकांना सायंकाळी नौका विहार करतांना बोटीत बसूनच नयनरम्य लेझर शो आणि म्युझिकल फाऊंटनचा आनंद उपभोगता येणार आहे. सिटीपार्क पाठोपाठ प्रबोधनकार ठाकरे सरोवर हे आता पूर्ण कुटुंबाला एकत्र फिरण्यासाठी एक निसर्गरम्य व रमणीय स्थळ ठरत आहे. या सरोवराच्या ठिकाणी सकाळ,संध्याकाळ फिरायला येणा-या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून येत्या नववर्षात नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा देण्याबरोबरच प्रबोधनकार ठाकरे सरोवर परिसरात सौंदर्यीकरण करण्यात येत आहे,तथापि या तलावाच्या जॉगिंग ट्रकवर मॉर्निंग वॉकसाठी येणा-या काही नागरिकांकडून येथील सौंदर्यीकरणाला गैरसमजुतीमुळे विरोध होत होता. तथापि जॉगिंग ट्रॅकच्या सुविधेमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा न आणता, तलाव परिसराच्या सौंदर्यीकरणाला कोणतीही बाधा न आणता अधिक चांगल्या सुविधा देखील नागरिकांना उपलब्ध दिल्या जाणार असल्याची माहिती महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी दिली आहे.

सकाळी 6.00 ते रात्री 11.00 या वेळेत प्रबोधनकार ठाकरे सरोवर नागरिकांसाठी खुले राहणार असून येथील विविध सुविधांमुळे आणि सौंदर्यीकरणामुळे नागरिकांना आरोग्यदायी जीवनासाठी आणि विरंगुळयासाठी चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे , यामुळे कल्याण शहरातील पर्यटनाला चालना मिळण्यास नक्कीच मदत होणार आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा कर्मचारी रूपेश टेंभे याच्या प्रामाणिकपणाचा सन्मान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा कर्मचारी वाहनचालक श्री रूपेश रमेश टेंभे यास कामावर असताना दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी कल्याण मधील एका महिलेचा दिड तोळ्याचा सोन्याचा हार फुलांच्या निर्माळयात सापडला.सदर सोन्याचा हार ज्या महिलेचा होता त्या महिलेस रूपेशने माणूस धर्म दाखवत प्रामाणिकपणे परत केला. सदर महिलेने रूपेशचे मनापासून आभार मानले.या कृतीतून रूपेशने आपला प्रामाणिकपणा दाखवून दिला.रूपेशच्या या प्रामाणिकपणाचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी माजी आमदार श्री निलेशदादा शिंदे यांच्या हस्ते श्री रूपेश टेंभे आणि त्याच्या सहकाऱ्यांचा सत्कार केला गेला.संपूर्ण कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून आणि कर्मचारी तसेच कल्याण परिसरातील जनतेतून आणि बापसई गावातून रूपेशच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक केले जात आहे.

### करावे ग्रामस्थांतर्फे
## दि. बा. पाटील विमानतळ दिशादर्शक फलकाचे अनावरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नवी मुंबई येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे व्हावे अशी पाचही सागरी जिल्ह्यातील भूमिपुत्रांची अतितीव्र इच्छा आहे. पाचही सागरी जिल्ह्यातील ग्रामस्थांनी गावातील मुख्यरस्ते, हायवे रोड, शहरातील रस्त्यांच्या कडेला दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय नामकरणाचे फलक स्वयमस्फूर्तीने लावले. यात नवी मुंबईतील एक प्रमुख गाव करावे गावाने देखील ऐन दिवाळीतच करावे ग्रामस्थांच्या वतीने टी. एस. चाणक्य सिग्नल पामबीच करावे गाव येथे "दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ" दिशादर्शक फलकाचे अनावरण करण्यात आले. या उपक्रमासाठी करावे गाव सुधार समितीचे अध्यक्ष योगेश तांडेल व दोस्ती ग्रुप करावे गाव यांनी विशेष पुढाकार घेतला. सोबत करावे गावातील वरिष्ठ, तरुणवर्गाचा सहभागही आश्वासक होता. नामफलक अनावरणानंतर झालेल्या चर्चेत सर्वानुमते असा विश्वास व्यक्त केला गेला की यापुढे दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण संदर्भात सर्वच बाबीत करावे ग्रामस्थ हिरहिरीने सहभागी होतील, तसेच आंदोलनाचे यजमान घेण्यास आम्ही सदैव तयार असल्याचे सांगितले. हा भूमिपुत्रांच्या अस्मितेचा प्रश्न असून त्यासाठी वेळोवेळी मोठमोठी आंदोलनेही झाली. मागच्या महिन्यातच खासदार सुरेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पाचही सागरी जिल्ह्यातील भूमिपुत्र संघटनाच्या सहकार्याने भिवंडी-नवी मुंबई-विमानतळ मार्गे जासई अशा भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात कमी कालावधीत ३००० हून अधीक गाड्या सहभागी झाल्या होत्या. या रॅलीच्या प्रभावाने प्रथमच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतल नामकरण संदर्भात विशेष बैठक सह्याद्री अतिथीगृहावर बोलावली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी महोदयांनी असे सांगितले की भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेबही दिबांच्या नावाबाबत सकारात्मक आहेत व तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे.

या सर्व बाबींचा विचार करून, मुख्यमंत्र्यांच्या शब्दाचा मान राखून दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजीचे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते. ८ ऑक्टोबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे तांत्रिक उदघाटन ही झाले. जीथे त्यांनी दिबा पाटील यांचे स्मरणही केले परंतु नामकरण बाबत उल्लेख टाळला, जे सर्व भूमिपुत्रांसाठी खूपच निराशाजनक होते. निराशा जरी असली तरी भूमिपुत्र स्वस्थ बसणार नाही आणी जोपर्यंत विमानतळाला दिबांचे नाव लागत नाही तोपर्यंत चळवळ सुरूच ठेवणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# दिवाळी निमित्त कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी साधला पत्रकारांशी संवाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी उलवा नोडमध्ये सर्वप्रथम सुरुवात केली. ही परंपरा जपण्यासाठीच 'यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था' आणि रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे शेलघर येथे 'दिवाळी पहाट' हा सुमधुर गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.
'इंडियन आयडाल' सागर म्हात्रे, 'होऊ दे धिंगाणा फेम' विनल देशमुख, 'सूर नवा ध्यास नवा फेम' श्वेता म्हात्रे, तृप्ती दामले यांच्या बहारदार गायनाने 'दिवाळी पहाट' कार्यक्रम मोठ्या उत्साहात रंगला होता. विशेष म्हणजे 'लास्ट स्टॉप खांदा' या चित्रपटाची टीमही यावेळी उपस्थित होती. 'दिवाळी पहाट' कार्यक्रमानंतर शेळघर मधील समाज मंदिर सभागृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. सुरवातीला न्यू मॅरिटाईम ॲण्ड जनरल कामगार संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील यांनी प्रस्तावना केली. या प्रस्तावनेत त्यांनी कामगार संघटनेची माहिती, यशस्वी घोड दौड इत्यादी विषयी माहिती दिली. या नंतर न्यू मॅरिटाईम ॲण्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी सामाजिक राजकीय कामगार क्षेत्रातील कार्यासंबंधी हितगुज करून वर्षभरात विविध कंपनी मध्ये झालेले वेगवेगळे करार, बोनस, संघटनेचे विस्तार याविषयी माहिती दिली. पत्रकार हा समाजातील महत्वाचा



घटक आहे. पत्रकारांमुळेच आम्हाला प्रसिद्धी मिळते. आम्हाला काम करण्याची प्रेरणा मिळते. न्यू मॅरिटाईम ॲण्ड जनरल कामगार संघटनेच्या यशस्वी घोडदौड मध्ये पत्रकारांचा महत्वाचा वाटा आहे. महत्वाचे योगदान आहे त्यांचे आभार मानण्यासाठी व पत्रकारांचा यथोचित मानसन्मान करण्यासाठी दरवर्षी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येते अशी माहिती महेंद्रशेठ घरत यांनी दिली.

व्यासपीठावर कामगार नेते महेंद्रशेठ घरत, कार्याध्यक्ष पी के रामण, सरचिटणीस वैभव पाटील, किरीट पाटील, जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील, जेष्ठ पत्रकार दा.चा. कडू, रायगड महिला जिल्हाध्यक्ष रेखा घरत, विनोद म्हात्रे आदि मान्यवर उपस्थित होते. जेष्ठ पत्रकार दा.चा. कडू यांनी कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे आभार व्यक्त केले. कामगार नेते तथा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत हे संपूर्ण महाराष्ट्रात असे एकमेव नेते आहेत की जे पत्रकारांसोबत दरवर्षी दिवाळी साजरा करतात. पत्रकारांच्या सुखदुःखात सहभागी होतात. पत्रकारांना नेहमी मदत करतात. त्यांच्या सारखा नेत्यांची सर्वांना गरज आहे असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार दा.चा. कडू यांनी केले. पत्रकारांना नेहमी मानसन्मान देत असल्याने जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील यांनीही महेंद्र घरत यांचे पत्रकारांच्या वतीने आभार मानले लक्ष्मी पूजनाच्या दिवशी युनियनची पत्रकार परिषद दरवर्षी घेतली जाते. ही १९९० पासूनची प्रथा आहे. या पत्रकार परिषदेत कामगारांसाठी वर्षभरात केलेले करार, पत्रकार परिषद आणि विविध कंपन्यांमधील बोनस आणि विविध कंपन्यांमधील बोनसचा आढावा घेतला घेतला जातो. तसेच पत्रकार बांधवांनी आपापल्या वृत्तपत्रांत दिलेल्या बातमी गेल्या अनेक दशकांपासून सुरू आहे, यावेळी बातम्यांबद्दल आभार मानले जातात. पत्रकारांशी संवाद साधून त्यांचीहीँ दिवाळी मिठाई देऊन गोड केली जाते. यावेळी दिवाळी अंकांचा साहित्यिक वारसा जपण्यासाठीच यंदा पहिल्यांदाच त्यांचे अनुभव, तसेच इतरही ज्यांनी 'सुखकर्ता' या दिवाळी अंकाचे प्रकाशन कामगार नेते महेंद्र घरत व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. हा दिवाळी अंक कैलास मानसरोवर या विषयाला वाहिलेला आहे. दोन वेळा कैलास मानसरोवर यात्रा करणारे महेंद्रशेठ घरत हे बहुआयामी अवलिया आहेत. त्यामुळे कैलास मानसरोवर यात्रा केली आहे, त्यांच्या अनुभवाची शिदोरी वाचकांना देण्याचा प्रयल सुखकर्ता' या दिवाळी अंकातून करण्यात आला आहे. शेलघर येथील दिवंगत जोमा नारायण घरत समाज मंदिर सभागृहात पत्रकार परिषद संपन्न झाली. या प्रसंगी रायगड जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्ष पदी रेखा घरत यांची नियुक्ती झाल्याने कामगार नेते महेंद्रशेठ घरत व जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील, जेष्ठ पत्रकार दा. चा. कड़ यांनी त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शेलघर येथील यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्थे'ची मोलाची भूमिका सौस्कृतिक वारसा जपण्यासाठी जपण्यासाठी असल्याने रसिकांनी आणि आणि पत्रकार बांधवांनी या सामाजिक चळवळीचा वसा जपण्यासाठी महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई घरत यांनी केले होते.

# ९ नोव्हेंबर रोजी बंजारा समाजाचा दादर शिवाजी पार्क येथे महामेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : ९ नोव्हेंबर रोजी मुंबईचे ऐतिहासिक मैदान शिवाजी पार्क दादर या ठिकाणी दीपावली मिलन महामेळावा होणार असून जय सेवालालचा नारा देत पांढर वादळ मुंबईत धडकणार आहे,बंजारा समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळे पर्यंत या लढ्यात खंबीर पणाने उभा राहणार असून बंजारा समाजासाठी वसंतराव नाईक हे देवतुल्य आहेत तसेच निरंजन वसंतराव नाईक हे त्यांच्या विचारांचे पाईक असल्यामुळे ते सुद्धा बंजारा समाजाकरिता देवतुल्य आहेत. भारतीय संस्कृती ही राजाच्या मुलाला राजा, नेत्याच्या मुलाला. नेता, तर साधुसंताच्या कुटुंबातील साधू , संत महाराज महंत मानणारे आहे वसंतराव नाईक यांच्या मुलानी या आंदोलनात उडी घेतल्यामुळे आंदोलनास बळकटी मिळणार आहे , या आंदोलनास निरंजन नाईक हे संबोधित करणार असून हे आंदोलन केवळ महाराष्ट्रपुरते न थांबता दिल्लीचा तक्तापर्यंत आम्ही घेऊन जाणार असल्याचे आंदोलनाचे मार्गदर्शक नेते, माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी सांगितले.

**हैदराबाद गॅझेट प्रमाणे बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गाच्या मागणीचे आंदोलन**

**माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे चिरंजीव निरंजन वसंतराव नाईक यांनी आंदोलनात घेतली उडी .**



ठाणे ◆रविवार
२६ ऑक्टोबर २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

# सफाई कर्मचाऱ्याने कचऱ्यात मिळालेला सोन्याचा हार केला परत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मधील बातमी माणुसकीवरचा विश्वास अधिक दृढ करणारी आहे. कचरा संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, कचऱ्यात चुकून फेकलेला सोन्याचा महागडा हार कोणताही मोह न ठेवता थेट संबंधित महिलेला परत केल्याचे समोर आले आहे. कल्याण पूर्वेत राहणाऱ्या एका महिलेने तिचा सोन्याचा हार हा नजरचुकीने घरातील कचऱ्याच्या पिशवीत टाकला. त्यानंतर तो सोन्याचा हार कचरा संकलन करणाऱ्या गाडीत गेला. मात्र तिने धीर सोडला नाही आणि तातडीने याबद्दलची माहिती केडीएमसी अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर कर्मचाऱ्यांनीही प्रामाणिकपणे तो हार शोधून तिला परतही केला.

# परतीच्या पावसाने बळीराजाची शेती उध्वस्त

## तात्काळ नुकसान भरपाई मिळावी -सी.आर.म्हात्रे







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : शासनाने जर वेळीच भरघोस मदत केलं नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्था कोसळेल. कारण या वर्षीचा परतीचा पाऊस शेतकऱ्यासाठी अभिशाप ठरला आहे.साधारणपणे हा पाऊस पिकाला अंतिम जीवनरस देतो,पण यंदा मुसळधार पाऊस पडत आहे,त्यामुळे हा परतीचा पाऊस पीक नाशक ठरला आहे.कोकण,रत्नागिरी,सिंधुदुर्ग, रायगड ,काही ठिकाणी पुणे ,सातारा या ठिकाणी पिकांची दयनीय अवस्था झाली आहे.

कापनीस आलेले पीक अचानक सोसाट्याच्या वाऱ्याने,कोसळली आहे ,पिकावर पाणी साठले आहे,पीक कोंडतले आहे. धान्यात अंकुर फुटले आहे. आर्द्रतेमुळे वाळवण करणे अशक्य होत आहे. या पिकाला बाजारात किंमत मिळत नाही. महिने महिने कष्टकरून उभे केलेली पीक डोळ्यादेखत नष्ट होताना पाहून,त्याला अतोनात यातना ,डोळयात अश्रू दाटत आहेत.अशावेळी शासनाने,प्रशासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे.ही नैतिक जबाबदारी आहे, निवडणुकी पुरते जनतेच्या दारात जाणाऱ्या लोकप्रतिनिधींनी आपला आवाज शासन दरबारी पोहचवला पाहिजे,विमा ,दावे. ,तातडीचे पंचनामे,होणे गरजेचे आहे. तातडीची मदत घोषणा न करता बळीराजाच्या हातात पडली पाहिजे नाहीतर झिरपत येईल.

हवामान बदल वारंवार होत आहे ,त्यासाठी शेतीविषयक धोरणात बदल होणे अपरिहार्य आहे.हवामान प्रतिरोधक शेती प्रणालीची ,पाणी नियोजन करणे गरजेचे आहे. पिकांचे वैविध्यपूर्ण बदल आणि शाश्वत तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे.नाहीतर नेहमी हा परतीचा पाऊस शेतकऱ्यांना उध्वस्त करेल.

बळीराजा केवळ शेतात नाही तर थाळीत जिवंत आहे. त्याचे अश्रू मातीची ओल नाही तर अंतःकरणाची ओल आहे. या अश्रूंना उत्तर देणे शासनाचे कर्तव्य आहे. आपल्या खारेपाटात सिंचनाचे पाणी हाच उपाय,दुबार शेती आपल्याला वाचवेल, पण पाणी देण्याची मानसिकता पाहिजे.ती दिसत नाही.नाहीतर ठेविले अनंते तैसेची रहावे पाण्याविना अशी आपली गत झाली असल्याची खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केली

# ओबीसींच्या क्रिमीलेअरच्या उत्पन्नाची अट वाढविण्याबाबतचा विषय लोकसभेत मांडावे !

## ओबीसी संघर्ष समितीची खासदार सुरेश म्हात्रे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : ओबीसींच्या क्रिमीलेअरच्या उत्पन्नाची अट वाढविण्याबाबतचा विषय लोकसभेत मांडून त्याबाबत प्रयत्न करावेत अशी मागणी ओबीसी संघर्ष समिती, ठाणे यांच्या वतीने खासदार सुरेश म्हात्रे (बाळया मामा) यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

व्ही.पी.सिंग सरकारने ओबीसी प्रवर्गासाठी 1990 ला मंडळ लागू करण्याची घोषणा केली. परंतु मंडळ आयोग रद्द व्हावा म्हणून उच्चवर्णीय समाज सुप्रीम कोर्टाने यावर निकाल देत असताना मंडळ आयोग मार्फत ओबीसींना दिलेले आरक्षण वैद्य ठरवले. परंतु सन 1992 मध्ये क्रिमिलियरची अट लावण्यात आली. तसेच आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांना आरक्षण देण्याची तरतूद राज्यघटनेत नाही मात्र कलम 15 (4) आणि 16 (4 ) यामध्ये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांच्या आरक्षणाची तरतूद आहे. हे क्रिमिलेअर लादून आर्थिक आधारावर दिलेलं आरक्षण असं स्वरूप करून टाकण्यात आले असे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, सुरुवातीला सहा लाख असलेली उत्पन्न मर्यादा आठ लाख केल्याने पालक आपल्या पाल्याला उच्च शिक्षण देऊ शकत नाही त्यामुळे आठ लाखांच्या वर उत्पन्न असेल तर ओबीसी आरक्षणाचा फायदा होत नाही यामुळे नॉन क्रिमिलेअर साठीची उत्पन्नाची अट किमान 15 लाखांपर्यंत करण्यात यावी अशी मागणी लोकसभेत करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत यासाठी ओबीसी संघर्ष समितीचे पदाधिकारी यांनी खासदार सुरेश म्हात्रे यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन दिले असल्याचे ओबीसी संघर्ष समितीचे सरचिटणीस प्रमोद जाधव यांनी म्हटले आहे.

# उल्हासनगरमध्ये सामाजिक एकात्मतेची सुरमयी दिवाळी पहाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगरच्या श्रीरामनगरात खांदेशातील मर्हाठमोळ्या नागरिकांची मोठी वसाहत आहे.भारतीय सण उत्सव येथे मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. यंदा पहिल्यांदाच ईथल्या तरुणाईने पुढाकार घेऊन दिवाळी पहाटचे आयोजन केले होते. नागरिकांच्या भव्य प्रतिसादाने यंदाची ही दिवाळीची पहाट अविस्मरणीय ठरली. स्थानिक कलावंतानी साकारलेली भावगीते-भक्तिगीतांच्या गोड सुरांनी सजलेलं 'स्वरतरंग' संगीतमय मैफिलिच्या सादरीकरणाने श्रीरामनगरच्या नारिकांमध्ये दिवाळीच्या आनंद, अध्यात्मिक थस आणि संस्कृतीचा अभिमानाचे दर्शन घडवले.

उल्हासनगर युवा प्रबोधिनीने दिवाळीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या "दिवाळी पहाट" कार्यक्रमाने नागरिकांच्या हृदयात स्वरांचा उत्सव जागवला. हाच आनंदोत्सव अधिक सुंदर करण्यासाठी उल्हासनगर-४ मधील श्रीरामनगर येथे उल्हासनगर युवा प्रबोधिनी तर्फे "स्वरतरंग – सप्तसुरांची संगीतमय व प्रकाशमय दिवाळी पहाट" हा सुरेल आणि भावमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या विशेष कार्यक्रमाचे संयोजन निखिल पाटील आणि राजेश भंगाळे यांनी उत्तम प्रकारे केले होते. दिवाळीच्या मंगल वातावरणात सुरांची उधळण करत राजेश भंगाळे, मनोज भंगाळे, कु. देवश्री भंगाळे, कु. अर्णवी मोहिते, धनश्री नकाशे आणि प्रा. प्रकाश माळी सर यांनी भावगीते, भक्तिगीत आणि पारंपरिक मराठी गीते सादर करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.या गायकांना सागर गोगावले, केशव चोरगे आणि आदिराज पालांडे यांनी वाद्यसंगतीची अप्रतिम साथ दिली. विशेष आकर्षण ठरले ते अतुल फेगडे यांचे मधुर बासरी वादन, ज्याने पहाटेचे वातावरण अधिकच दिव्य केले. या कार्यक्रमाचे निवेदन प्रल्हाद कोलते यांनी केले. हृदयस्पर्शी या दिवाळीच्या पहाटेच्या या सोहळ्याचा आस्वाद घेण्यासाठी परिसरातील सुमारे शेकडो महिला आणि नागरिक सकाळी सहा वाजेपासुन ते सुर्य डोक्यावर येईपर्यत मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाशाच्या झगमगाटात आणि सप्तसुरांच्या निनादात साजरी झालेली ही 'स्वरतरंग' दिवाळी पहाट उल्हासनगरच्या सांस्कृतिक परंपरेत एक सुंदर अध्याय म्हणून कायम स्मरणात राहील अश्या प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी दिल्या.

### भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरात

# चित्रपटाच्या प्रमोशन निमित्ताने कलावंतांची उपस्थिती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : "पुन्हा शिवाजीराजे भोसले, याच साठी केला होता अट्टाहास" या चित्रपटाच्या प्रमोशन निमित्ताने सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता महेश मांजरेकर यांच्या नेतृत्वाखाली चित्रपट कलावंत सिद्धार्थ जाधव,सिद्धार्थ बोडके,मंगेश देसाई, त्रिशा ठोसर,पृथ्वीक प्रताप,भार्गव जगताप,विक्रम गायकवाड,संदीप जुवतकर ,निलश्री झानलक्ष्मी अदि मान्यवर कलावंतांनी भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ याठिकाणी महाराजांच्या मूर्तीसमोर नतमस्तक होत मुजरा करीत महाराजांना नमन केले.

आपण जे अन्न खातो जो पिकवतो त्या शेतकऱ्यासाठी बनवलेला हा सिनेमा आहे.महाराष्ट्रासह देशभरातील बळीराजाची परिस्थिती बिकट आहे. शेतकरी आत्महत्या करत आहे. विदर्भात शेतकऱ्यांनी कापूस आणि सोयाबीन पिकाला भाव न मिळाल्याने आत्महत्या केल्या आहेत. हे कधी थांबणार आहे.या चित्रपटाच्या माध्यमातून समाजात जनजागृती व्हावी.सरकार आपल्या परीने जे करायचे ते करते,कर्जमाफी मदत करते पण या चित्रपटाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांना उत्तेजीत करता आले तर माझा चित्रपट बनवण्याच्या हेतू साध्य झाला असं मी समजेल अशी प्रतिक्रिया चित्रपट निर्माते महेश मांजरेकर यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांचे जीवन आनंदी कसे करता येईल यासाठी लोकांनी प्रयत्न केला एक ही शेतकरी आत्महत्या करणार नाहीत हा हेतू चित्रपट बनवण्यामागे आहे अशी माहिती महेश मांजरेकर यांनी दिली आहे.

भिवंडीतील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तिपीठ हे सर्वसामान्य शेतकरी वर्गाने आपल्या मेहनतीने शासन मदतीशिवाय उभारलेले मंदिर आहे याचे कौतुक केले पाहिजे.आम्ही या शक्तिपीठावर दर्शना साठी आलो नसतो तर आमच्या चित्रपटासाठी ती उणीव राहिली असती अशी प्रांजळ कबुली महेश मांजरेकर यांनी दिली.पप प्रसंगी शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजुभाऊ चौधरी यांनी महेश मांजरेकर,सिद्धार्थ जाधव व सर्व कलावंतांचे पुष्पगुच्छ व शक्तिपीठाची प्रतिमा असलेले स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला.

**शिवक्रांती प्रतिष्ठानवतीने भिवंडी,वाडा शहापूर या तीन तालुका मर्यादित किल्ले बनविण्याच्या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ महेश मांजरेकर यांच्या हस्ते करण्यात आला. कट्टा बॉईज ग्रुप वज्रेश्वरी,भैरवकृपा ग्रुप कोंबडपाडा, ताडोबा ग्रुप वासिंद या मंडळांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय रोख पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त नागरिक उपस्थित होते.**

# फटाके लावण्यावरून मोहने येथे दोन गटांमध्ये तुफान राडा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर मोहने परिसरात फटाके लावण्यावरून दोन गटांमध्ये झालेल्या वादाने बुधवारी रात्री तुफान राड्याचे रूप धारण केले. या राड्यात लहुजीनगर व मोहने गाव येथील युवक आमनेसामने आले. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फटाके लावण्यावरून दोन व्यक्ती मध्ये भांडण झाले. त्या मध्ये एक फटका स्टॉल वाला होता आणि एक फटका उडविणारा होता. त्याच्यातील बाचाबाचीचे रूपांतर भांडणात झाले. किरकोळ वादाक्सचे अल्पावधीतच मोठ्या हाणामारीत रूपांतर झाले. हाणामारीतून प्रकरण दगडफेकीत बदलून तुफान दगडफेक सुरू झाली. दोन्ही गटाकडून दगडफेक करण्यात आली. यात मोहने गावातील अनेक युवक जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली घेतली असून दोन्ही गटातील युवकांना पोलिसांनी अटक केली आहे. मात्र दोन्ही गटांच्या युवकांनी पोलिसांसमोरच दगडफेक केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या संख्येने पोलीस दल तैनात करण्यात आले आहे.**

**या घटनेत मोहने येथील तीन जण जखमी झाल्याची तसेच लहुजी नगर येथील एका महिला कार्यकर्ते सह एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, खडकपाडा पोलिसांनी दोन्ही गटांतील प्रमुखांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.तर परस्पर विरोधी गुन्हे दाखल करून पोलीस कायदेशीर कारवाई करीत असल्याचे एसीपी कल्याणजी घेटे यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.**

# एमआयडीसी निवासीमध्ये कचरा संकलनसाठी घंटागाडीचा घोळ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली एमआयडीसी निवासी मध्ये गेले काही दिवस घरगुती कचरा गोळा करण्यासाठी येणाऱ्या गाड्या नियमित किंवा वेळेवर येत नाहीत. काही ठिकाणी तर सलग दोन तीन दिवस घंटागाड्या न आल्याने रहिवासी बेजार होऊन त्यांनी तो राग, रोष समाज माध्यमातून प्रकट केला. परंतु याचा काहीही उपयोग होतांना दिसत नाही. सद्या चेन्नई पॅटर्न प्रमाणे एका खाजगी ठेकेदाराला कचरा उचलण्याचे कंत्राट दिले आहे. त्यांच्याकडे अपुऱ्या घंटागाड्या आणि अपुरे खाजगी कर्मचारी असल्याने हे होत आहे आहे.

शिवाय हे ओला व सुखा कचरा पुढे एकत्रच करीत असल्याचे दिसत आहे. घरगुती कचरा नियमित उचलला जात नसल्याने काही नागरिक नाईलाजास्तव तो कचरा रस्त्यावर कडेला पिशवीत ठेवून जात आहेत. आधीच रस्त्यावर झाडांचा पालापाचोळा व इतर कचरा जमा होत असताना त्यात हा घरगुती कचरा जमा झाल्याने सर्वत्र अस्वच्छता पसरली असून रोगराई होऊन आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. हा कचऱ्याचा प्रश्न गंभीर होत असल्याने काही जागरूक नागरिकांनी ही बाब कल्याण डोंबिवली महापालिकेचे घन कचरा व्यवस्थापन उपायुक्त रामदास कोकरे यांच्याकडे तक्रार केली असून त्यांनी यात जातीने लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. मिलापनगर मधील एक ज्येष्ठ नागरिक आणि वकील मुकुंद वैद्य यांनी केडीएमसीचे आयुक्त अभिनव गोयल यांना ईमेल करून येथील परिस्थितीची माहिती देऊन तक्रार केली आहे. जर परिस्थिती सुधारली नाही तर काहीजण यापुढे पंतप्रधान मुख्यमंत्री कार्यालयाकडे पण ऑनलाईन तक्रारी करणार आहेत. कचऱ्यासारखा एवढा गंभीर प्रश्न निर्माण झाला असलातरी येथील सर्व राजकीय पदाधिकारी इच्छुक उमेदवार यात पाहिजे तसे लक्ष घालताना दिसत नाही. त्यात ऐन दिवाळीत वीज पाणी पुरवठा अनेकदा खंडित होत होता. यामुळे निवासी भागातील जनता आता विटली असून एखादे प्रखर आंदोलन करण्याचा विचारात असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.

# सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : संकल्प संस्था आयोजित 'सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग' रविवार १६ नोव्हेंबरपासून नेहरूनगर कुर्ला या ठिकाणी सुरू करण्यात येत आहे. संकल्प संस्था गेल्या बारा वर्षापासून मुंबई आणि ग्रामीण विभागात वस्ती विकास प्रकल्प अंतर्गत अनेक सामाजिक विषयावर काम करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून समाजात एक उत्तमोत्तम सामाजिक कार्यकर्ता घडावा, या उद्देशाने या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण वर्गात प्रत्यक्ष वस्ती पातळीवर कार्य करण्याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण अनुभवी तज्ञ व्याख्याते यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात येणार असून शासकीय निम शासकीय संस्था संघटना यांच्या कार्यालय भेटी देऊन प्रॅक्टिकल नॉलेज ही देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण वर्गात १५ रविवार व्याख्याने आणि ५ शनिवार संस्था, संघटना भेटी असे २० आठवडे असे असेल. प्रशिक्षण वर्गात साधारण ३५ ते ४० विषयांचा समावेश केलेला आहे.

त्यामध्ये समाजकार्य म्हणजे काय? समाज कार्याच्या पद्धती, वस्ती पातळीवर समाजकार्य, मानव विकास आणि वर्तणूक, समाजाचे आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरण, बालकांचे अधिकार, संस्था व्यवस्थापन, निधी संकलन, प्रकल्प अहवाल लेखन, सामाजिक समस्या, सरकारी योजना, व्यक्तिमत्व विकास, गट कार्य, नेतृत्व गुण, गट बांधणी, संवाद कौशल्य, भारतीय संविधान, फुले, शाहू, आंबेडकर चळवळ, पोलीस यंत्रणा, अंधश्रद्धा निर्मूलन, अपंग ज्येष्ठ नागरिक यांचे अधिकार, रेशनिंग यंत्रणा, रुग्ण हक्क अधिकार, मानवी तस्करी, माहितीचा अधिकार, जनसंपर्क माध्यमे, महानगरपालिका यंत्रणा कार्यपद्धती, नशा मुक्ती अभियान, सूत्रसंचालन, पथनाट्याच्या माध्यमातून सामाजिक विषयाची मांडणी, आपत्ती व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची भूमिका या विषयावर व्याख्यान होणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेण्यासाठी जे इच्छुक आहेत, त्यांनी विनोद हिवाळे ९९६९३९१०२५, सविता हेंडवे ८४३३५०५४६४, दीपा गमरे ८००७९३५२९६, वनिता सावंत ९३२४०९६०४९ यांच्याशी संपर्क साधावा असे संस्थेमार्फत सांगण्यात आले आहे.

# भिवंडीत "बळी पहाट" सामाजिक प्रबोधन करणारा कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी, चौधरपाडा येथे ओबीसी संघर्ष समिती आयोजित आणि राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तुत "बळी पहाट" हा सांस्कृतिक आणि सामाजिक प्रबोधन करणारा कार्यक्रम भिवंडी तालुक्यातील चौधरपाडा येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

या कार्यक्रमाचा मुख्य हेतू इतिहासाची उजळणी करत समाजामध्ये जनजागृती घडविणे हा होता. समाजामध्ये प्रबोधन आणि परिवर्तन व्हावे, शेती–कृषी संस्कृतीचे जतन व्हावे, तसेच ओबीसी समाजाच्या हक्कांबाबत जागर व्हावे. या उद्देशाने हा कार्यक्रम सादर करण्यात आला. गेल्या दहा वर्षांपासून ओबीसी संघर्ष समिती रस्त्यावर उतरून ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर लढा देत आहे. समाजाला त्यांच्या संविधानिक हक्कांची जाणीव करून देण्यासाठी, शिक्षण–आरक्षण–राजकीय प्रतिनिधित्व या विषयांवर सतत जनजागृती करत आहे. "बळी पहाट" हा त्याच चळवळीचा एक विस्तार ठरला.

या कार्यक्रमातून ओबीसी जनजागृती हा मुख्य विषय मांडण्यात आला. ओबीसींचे आरक्षण कशाप्रकारे संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे, हे उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर जातनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित करत, सामाजिक न्याय आणि हक्कांच्या लढ्यासाठी ती किती आवश्यक आहे हे प्रभावीपणे मांडण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे लेखक दिग्दर्शक, निवेदक प्रमोद जाधव यांनी बोलताना सांगितले की — "बळीराजाच्या बाबतीत भाबड कथांवर विश्वास न ठेवता खऱ्या इतिहासाचा शोध घेणे गरजेचे आहे." तुकोबारायांच्या अभंगांचा दाखला देत त्यांनी बळीराजाच्या स्मृतींना उजाळा दिला. सादरीकरणातून शेतकरी वर्गाचे दुःख व संघर्ष, "बळीचे राज्य" येण्याची लोकांची आस, तसेच शिवराय–संभाजी महाराज, जिजाऊ, महात्मा फुले–सावित्रीबाई, रमाई, राजश्री शाहू महाराज यांच्या कार्याचे स्मरण, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या स्वातंत्र्य–न्याय–समता–बंधुभावाच्या मूल्यांचा जागर करण्यात आला. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच ओबीसी समाजाने आपले अधिकार संघटितपणे मागणे आवश्यक आहे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे लेखन, दिग्दर्शन आणि निवेदन प्रमोद जाधव यांनी केले. निवेदक राजेंद्र पाटील, साधना भेरे, ज्योती दवणे, नीलम भोईर आणि साक्षी वाघेरे यांच्या प्रभावी सादरीकरणाने कार्यक्रम रंगला, तर गायक अरुण गगे, दिनेश भोईर, संतोषी जाधव आणि रुपाली जाधव यांच्या मधुर आवाजाने वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. राजमाता जिजाऊ कलामंचच्या नृत्यकलाकारांनी सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

"बळी पहाट" हा केवळ मनोरंजन करणारा नव्हे, तर शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या संस्कृतीचा तसेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांचा वास्तवदर्शी दस्तऐवज ठरला. उत्कृष्ट नियोजन, विचारपूर्वक संहिता, प्रभावी सादरीकरण आणि सामाजिक आशय यामुळे हा सांस्कृतिक आविष्कार प्रेक्षकांच्या कमालीच्या पसंतीस उतरला.

जयवंत पाटील, कुंडलिक पाटील, पंडित पाटील, योगेश पाटील, विनोद भोईर, राजेंद्र पाटील, अशोक पाटील, संदीप वाघेरे, अजय किरपण, शाम पाटील, रुपेश मांजे, दत्ता दवणे, तुषार शेलार आदी कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली.

# मंगळवारी कल्याणमध्ये पाणीबाणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : येत्या मंगळवारी कल्याण पूर्व पश्चिमेसह विविध भागांचा पाणीपुरवठा तब्बल 9 तास बंद राहणार आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे आणि मोहिली जलशुद्धीकरण केंद्रात रॉ वॉटर चॅनेल येथील गाळ काढण्यासह विद्युत तसेच यांत्रिकी उपकरणांच्या दुरुस्तीसाठी येत्या मंगळवारी 28 ऑक्टोबर 2025 रोजी कल्याणसह इतर काही भागाचा पाणीपुरवठा 9 तास बंद राहणार आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावी आणि मोहिनी जलशुद्धीकरण केंद्रामधून कल्याण पश्चिम कल्याण पूर्व कल्याण ग्रामीण विभागातील वडवली शहाड आणि टिटवाळा गाव परिसरात होणारा पाणीपुरवठा येत्या मंगळवारी सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत बंद राहणार आहे. तरी या परिसरातील नागरिकांनी पाण्याचा आवश्यक तो साठा करून महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई नवी मुंबई ठाणे पालघर रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024